पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक : ११
<u>सभावृत्तांत</u>

दिनांक : ४/१२/२००९ वेळ : दुपारी २:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दि.४/१२/२००९ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे - सभापती
२. मा.एकनाथ मोटे
३. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब
४. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश
५. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
६. मा.खोमणे लता हनुमंत
७. मा.चौधरी अख्तरहुसेन तालुकदार
८. मा.बाबर प्रकाश धरमसी

याशिवाय मा.देशमुख,मा.गावडे - सहा.आयुक्त,मा.काळे - नगरसचिव, मा.निकम,मा.दुधेकर,मा.महाडिक,मा.सवणे - कार्य.अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------------

<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेणेत आले-</u>

विषय क्रमांक :- ९) चिंचवड एल्प्रो कंपनी आवारातील जागेतील मनपाचे ब प्रभाग कार्यालयाचे काम करणेबाबत..

विषय क्रमांक :- १०) अपंग प्रवर्गात सफाई कामगार पदे भरण्याबाबत..

विषय क्रमांक :- ११) प्रभाग क्र.७६ रहाटणी येथील विकास योजनेतील रस्त्याचे खडीकरण करणेबाबत..मा.प्रकाश बाबर,मा.अख्तरहुसेन चौधरी यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- १२) मजुर पुरविणेबाबत..मा.एकनाथ मोटे,मा.वसंत लोंढे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- १३) सहाय्यक उद्यान निरिक्षक व असि.हार्टिकल्चर पदांबाबत ..मा.स्मिता गुंजेकर,मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव..

१) दिनांक १८/९/२००९,३/१०/२००९,६/११/२००९,१३/११/२००९ व २०/११/२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ६) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

२) दिनांक ३/१०/२००९,६/११/२००९,१३/११/२००९ व २०/११/२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ७) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

३) दिनांक १६/१०/२००९,६/११/२००९,१३/११/२००९ व २०/११/२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ८) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

४) दिनांक ६/११/२००९,१३/११/२००९ व २०/११/२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ९) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

५) दिनांक २०/११/२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १०) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक :- २१९ विषय क्रमांक :- १
दिनांक :- ४/१२/२००९ विभाग : झोनिपु
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/६/कावि/१९१/०९ दि.२०.६.०९
विषय :- कै.महेश गायकवाड यांचे वारसांना मदत करणेबाबत..

विषय क्र.१ मधील बाबींसंबंधात झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागाने प्रारुप धोरण निश्चीत करुन त्याची प्रत सन्मा.सदस्यांस उपलब्ध करुन देणेची पुर्तता केल्यानंतरचे सभेचे वेळी विषय क्र.१ चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २२० विषय क्रमांक :- २
दिनांक :- ४/१२/२००९ विभाग : प्रशासन
सुचक :- मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/१३०९/०९ दि.११.११.०९
विषय :- प्राचार्य अभिनामाचे पद भरणेबाबत..

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २२१ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- ४/१२/२००९ विभाग : स्थापत्य ड
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/डमु/५२९/०९ दि.१२.११.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

थेरगाव वॉर्ड क्र.८२ मध्ये उर्वरित रस्ते बी.बी.एम. व हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी र.रु.२४,२४,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २२२ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- ४/१२/२००९ विभाग : विद्युत
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुके/वि/३९८/०९ दि.१६.११.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

मनपाचे से.क्र.२३ जलशुध्दीकरण केंद्राकरीता निगडी प्राधिकरण स्विचिंग सबस्टेशन ते जशुके पर्यंत उच्चदाब भूमिगत केबल टाकणे व अनुषंगिक कामे करणेकामी र.रु.४९,२९,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २२३ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- ४/१२/२००९ विभाग : अ प्रभाग,पाणीपुरवठा
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अप्र/पापु/१/कावि/१८३८/०९ दि.१७.११.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

अ प्रभाग कार्यक्षेत्रातील पाण्याच्या टाक्या,संप व पंपगृह इ.ठिकाणी व्हॉल्व्ह चालु बंद करणेसाठी मजुर पुरविणेकामी र.रु.१६,९६,२००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २२४ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- ४/१२/२००९ विभाग : ब प्रभाग,पाणीपुरवठा
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/कावि/१८७६/०९ दि.२१.११.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

ब प्रभागातील एम.एस.जलवाहिन्यांची देखभाल व दुरुस्ती करणेकामी र.रु.३०,३२,४००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २२५ विषय क्रमांक :- ७
दिनांक :- ४/१२/२००९ विभाग : स्थापत्य
सुचक :- मा.सिध्देश्वर बारणे अनुमोदक :- मा.एकनाथ मोटे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्थापत्य/कमु/९२१/०९ दि.२४.११.०९

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन..

प्र.क्र.८ मधील आ.क्र.२४ मधील नियोजित खेळाचे मैदानात जलतरण तलाव बांधणे (ब - उर्वरित सिमाभिंत बांधणे ) फिल्ट्रेशन व विद्युत विषयक कामे करणेकामी र.रु.४६,७६,६००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. कासारवाडी येथील जलतरण तलावाचे बरेचसे काम पुर्ण झालेले असुन गेल्या ६ महिन्यांपासुन सदरचे काम बंद अवस्थेत असलेने नागरीकांना त्याचा वापर करता येत नसलेने गैरसोय होत आहे. तरी सदरचे काम नव्याने निविदा न काढता पुर्वीच्या ठेकेदाकडुन पुर्ण करुन घ्यावे. सदर कामासाठी नव्याने निविदा काढल्यास निविदा कार्यवाही करुन प्रत्यक्ष काम करण्यास ६ महिने व काम पुर्ण करणेस ६ महिने असा एकुण १ वर्षाचा कालावधी लागणार आहे. तरी कालापव्यय टाळणेसाठी सदरचे काम पुर्वीच्याच ठेकेदाराकडुन निविदा न मागविता करणेत यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २२६ विषय क्रमांक :- ८
दिनांक :- ४/१२/२००९ विभाग : स्थापत्य
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्थापत्य/कमु/९२२/०९ दि.२३.११.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

प्र.क्र.८ मधील आ.क्र.२४ मधील नियोजित खेळाचे मैदानात जलतरण तलाव बांधणे (अ - उर्वरित कामे करणे)कामी र.रु.४६,७८,५००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले -</u>

ठराव क्रमांक :- २२७ विषय क्रमांक :- ९
दिनांक :- ४/१२/२००९ विभाग : ब प्रभाग स्थापत्य
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्थापत्य/बप्र/२/कावि/२९/०९ दि.२७.११.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

चिंचवड येथील एल्प्रो कंपनीच्या सि.स.नं.४२७० मधील जागा मनपाच्या ताब्यात आलेली आहे. सदर जागेत असलेल्या शेड मध्ये ब प्रभाग कार्यालय स्थलांतरीत करणेबाबत मा.आयुक्त यांनी आदेश दिलेले आहेत. सदरचे शेड सुस्थितीत असून सदर शेड मध्ये केबिन्स व इतर फर्निचरची आवश्यक कामे करणे, स्थापत्य विषयक कामे करणे, ॲल्युमिनिअम पार्टिशन करणे इ.कामे करणेकरीता सन २००८ - ०९ च्या दरसुचीनुसार र.रु. २२,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर कामाची त्वरा लक्षात घेता आरक्षण क्र.४० अ येथील बसडेपो मध्ये फर्निचर व केबिन्स करणे या कामातुन चिंचवड एल्प्रो कंपनीच्या आवारातील (सि.स.नं.४२७०)जागेत मनपाचे ब प्रभाग कार्यालयाचे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २२८ विषय क्रमांक :- १०
दिनांक :- ४/१२/२००९ विभाग : प्रशासन
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/३अ/कावि/११५८/०९ दि.३०.११.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

अपंग प्रवर्गात प्रस्तावातील परिशिष्ट अ आणि ब मध्ये नमुद केलेल्या निवडयाद्यांमधुन अंध व क्षीण दृष्टी उमेदवारांना आणि कर्णबधीर उमेदवारांना र.रु.५२०० - २०२०० + १९०० या वेतनश्रेणीत नेमणुक देण्यास व या नेमणुका दिल्यानंतर अपंग प्रवर्गात निर्माण होणा-या अनुशेषाचे रिक्त पदांवर प्रतिक्षा याद्यांमधुन उमेदवारांना गुणानुक्रमे नेमणुका देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २२९ विषय क्रमांक :- ११
दिनांक :- ४/१२/२००९
सुचक :- मा.प्रकाश बाबर अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.प्रकाश बाबर,मा.अख्तरहुसेन चौधरी यांचा प्रस्ताव..

विषय :- प्रभाग क्र.७६ रहाटणी येथील (स.नं.४०) विकास योजनेतील १२.०० मी रुंद रस्त्याचे खडीकरण करणे कामामधुन वॉर्डातील अंतर्गत रस्ते करणेबाबत (अं.र.रु.४९,१७,५००/-)

प्रभाग क्र.७६ रहाटणी येथील (स.नं.४०) मधुन जाणा-या विकास आराखडयातील १२.०० मी.रुंद रस्त्याची जागा मनपाच्या ताब्यात देण्याची जागामालकांनी संमती दर्शविली होती. विषयांकित कामाचा आदेश दि.२७/०२/२००९ रोजी देणेत आला आहे. पण त्यानंतर संबंधित जागामालकांनी सदरचा डी.पी.रस्ता ३.०० मी.ने.स्थलांतरीत करणेबाबत अट घातली आहे. त्यासंबंधीत व जागा ताब्यात घेणेबाबत नगररचना विभागामार्फत पुढील कार्यवाही चालु आहे व त्यास वेळ लागणार आहे. प्रभाग क्र.७६ मधील अंतर्गत रस्त्यांवर ठिकठिक्राणी खड्डे पडलेले असून नागरीकांच्या सोईच्या दृष्टीने सदर कामातुन वॉर्डातील अंतर्गत रस्ते करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २३० विषय क्रमांक :- १२
दिनांक :- ४/१२/२००९
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.वसंत लोंढे
संदर्भ :- मा.एकनाथ मोटे,मा.वसंत लोंढे यांचा प्रस्ताव..

क प्रभाग कार्यक्षेत्रातील पाण्याच्या टाक्या, संप व पंपगृह इ.ठिकाणी व्हॉल्व्ह चालु बंद करणेसाठी मजुर पुरविणेकामी र.रु. २०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २३१ विषय क्रमांक :- १३
दिनांक :- ४/१२/२००९
सुचक :- मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.स्मिता गुंजेकर,मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहा.उद्यान निरिक्षक व असि.हार्टिकल्चर सुपरवायझर या अभिनामाच्या मंजुर पदाची शैक्षणिक पात्रता “सरळसेवा प्रवेशाने - कृषि पदविका किंवा तत्सम अभ्यास क्रम व शासकीय किंवा निमशासकीय संस्थेमध्ये २ वर्ष कामाचा अनुभव”, अशी असुन त्यामध्ये “कृषी पदविका किंवा तत्सम अभ्यासक्रम व शासकीय किंवा निमशासकीय संस्थेमध्ये १ वर्ष कामाचा अनुभव”, असा बदल

करण्यास व सहा.उद्यान निरिक्षक व असि.हॉर्टिकल्चर सुपरवायझर या पदांचे पदनाम सहा.उद्यान निरिक्षक असे एकच करण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी- ४११ ०१८.नगरसचिव कार्यालय

क्रमांक - नस/९/कावि/ १३७८ /०९

दिनांक - ५/१२/२००९ चे लगत सही/-

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.